MHPU180021622016

## निशाणी क्र.८६ वरील आदेश
(दिनांक ०२.०४.२०२४)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांना जादा कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करुन कैफियत व जबाब दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याच्या कामी वादी यांनी दि.०५.०७.२०२२ रोजी दावा दुरुस्ती प्रत मे. कोर्टाच्या आदेशाने दाखल केलेली होती. सदरच्या दावा दुरुस्तीस जादा कैफियत प्रतिवादी यांना मुदतीत दाखल करता आली नाही म्हणुन सदर प्रतिवादी यांना १ वर्ष, २ महिने व १९ दिवसांचा उशीर झालेला आहे. प्रतिवादी यांना नजरचुकीने वादी यांनी दाखल केलेली दावा दुरुस्ती प्रत निदर्शनास आली नाही. तसेच दरम्यानच्या काळामध्ये लिगल पेपरवरुन अे४ पेपरवर वापर करण्याचा मा. उच्च न्यायालयाचा आदेश झाल्यामुळे सदरची दावा दुरुस्त प्रत ही प्रतिवादी यांना नजरचुकीने लक्षात आली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी दि.२५.०९.२०२३ रोजी वादी यांची दावा दुरुस्ती प्रत मे. कोर्टातुन घेतली आहे. त्यामुळे मुदतीत दाव्यास जादा कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. वरील परिस्थितीचा विचार करता प्रतिवादी यांना सदरील दाव्याच्या कामी त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. सबब प्रतिवादी यांना जादा कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करुन प्रतिवादी यांना जादा कैफियत दाखल करण्यास परवानगी न दिल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरील प्रतिवादी यांना जादा कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करुन प्रतिवादींना जादा कैफियत देण्यास परवानगी मिळणे गरजेचे व न्यायाचे आहे. या सर्व कारणास्तव सदर प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज मंजुर करण्यात येऊन त्यांना जादा कैफियत दाखल करण्यास झालेला १ वर्ष, २ महिने व १९ दिवसांचा उशीर माफ करुन प्रतिवादी क्र.३ यांची जादा कैफियत दाखल करुन घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. याउलट वादी यांनी प्रस्तुत अर्जास जोरदार विरोध करुन त्यांचा जबाब अर्जावरच लिहुन दिलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदरचा प्रतिवादी क्र.३ यांनी दिलेला अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नसुन या वादी यांना मान्य व कबुल नाही. सदरील अर्जातील कथन पाहता प्रतिवादी मे. कोर्टात हजर असतांनाही वादीच्या दाव्यास जादा

कैफियत देण्यास टाळाटाळ केलेली दिसुन येत आहे. सदरील दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतुने सदरील अर्ज प्रतिवादी हे देत आहे. सदर प्रतिवादी जादा कैफियत देण्याचा आणि **A4** साईज पेपरचा कुठलाही संबंध नाही. केवळ जाणुन–बुजून वादींना त्रास देण्याच्या हेतुने उशीरा जादा कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत देण्यास उशीराचे कोणतेही संयुक्तीक कारण दिल्याचे दिसुन येत नाही. सदर प्रतिवादी हे दाव्याची पुर्ण माहिती असुनही केवळ दाव्याचे कामकाज लांबवित आहे. या सर्व कारणास्तव त्यांनी सदरचा प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी क्र.३ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. एस. महाजन व वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एस. गवळी यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**५.** अर्ज व जबाब वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींनी प्रतिवादींविरुध्द अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी दि.०६.०९.२०१६ रोजी दावा दाखल केलेला आहे. दाव्यास दि.१७.०९.२०१६ रोजी क्रमांक पडलेला आहे. त्याच दिवशी माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादींना समन्स काढण्याचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र.४ ते ६ हे दाव्यात समन्सची बजावणी होऊनही गैरहजर राहिलेत. म्हणुन माझे पुर्वाधिकारी यांनी त्यांच्याविरुध्द दि.१४.०७.२०२० रोजी दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३, ७ व ८ यांनी त्यांची कैफियत व जबाब नि.१७ अन्वये दाखल केलेला आहे. नि.१९ अन्वये वादींनी दाव्यात परिच्छेद क्र.४अ, ८अ–अ व दाव्याच्या सरनाम्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता परवानगीचा अर्ज दाखल केलेला होता. त्यास प्रतिवादी क्र.१ ते ३, ७ व ८ यांनी नि.२२ अन्वये जबाब दाखल केलेला होता. माझे पुर्वाधिकारी यांनी गुणदोषावर नि.१९ दि.०७.०७.२०१७ रोजी मंजुर केला. त्या आदेशाच्या अनुषंगाने वादींनी नि.१९ प्रमाणे दाव्याच्या सरनाम्यात दावा निरंतर मनाई व विनंती कलम ८अ–अ नुसार दुरुस्ती केलेली आहे. वादीने नि.२७ अन्वये कोर्ट कमिशनर म्हणुन उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांची नेमणुक करुन दावा गट क्र.५७१ व प्रतिवादींचा गट क्र.८२४ या दोन्ही गटांची संयुक्तीक मोजणी करण्यात यावी अशा अशयाचा अर्ज दि.१९.०९.२०१७ रोजी दाखल केलेला होता. प्रतिवादी क्र.१ ते ३, ७ व ८ यांनी त्यास जबाब दिलेला होता. माझे पुर्वाधिकारी यांनी दि.२७.०२.२०१८ रोजी सदर नि.२७ गुणदोषावर मंजुर केला. त्यानंतर वादींतर्फे पुन्हा नि.३३ अन्वये कोर्ट कमिशनरचा अहवालाच्या अनुषंगाने अतिक्रमण क्षेत्रासंदर्भात परिच्छेद क्र.४ब व ८अ मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरीता अर्ज दाखल केला होता. प्रतिवादी क्र.१ ते ३, ७ व ८

यांनी त्यांचा जबाब नि.३३ अर्जावर लिहुन दिलेला होता. माझे पुर्वाधिकारी यांनी नि.३३ दि.०९.१०.२०१९ रोजी गुणदोषावर मंजुर केला. त्याअनुषंगाने वादींनी दाव्यात दुरुस्ती केलेली आहे. दावा दुरुस्त प्रत १ब वर प्रतिवादींना जादा कैफियत देण्याकामी दावा नेमण्यात आला होता. प्रतिवादी क्र.१ ते ३, ७ व ८ यांनी नि.४८ वरील आदेशानुसार परिच्छेद क्र.६अ, १० व ११अ अशी दुरुस्ती केलेली आहे. ती दुरुस्त कैफियत नि.१७अ वर दाखल आहे. प्रतिवादींनी नि.५० अन्वये नि.३२ कोर्ट कमिशनर अहवालासोबत दिलेल्या नकाशास हरकत घेतलेली आहे. नि.५१ नुसार वादींनी प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीर माफीचा अर्ज दाखल केलेला आहे. त्या अर्जावर **'Notice to Proposed L.Rs.'** असा आदेश झालेला आहे. त्यानंतर वादींनी नि.५३ अन्वये दाव्यात वादी क्र.३ व ४ यांना समाविष्ट करण्यासाठी व दाव्यात परिच्छेद क्र.४क, तसेच ८अ मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याचा अर्ज दाखल केला होता. तो अर्ज माझे पुर्वाधिकारी यांनी दि.१७.०२.२०२१ रोजी गुणदोषावर मंजुर केलेला आहे. त्या अनुषंगाने वादींनी दाव्यात दुरुस्ती केलेली असुन दुरुस्त दावा प्रत नि.१क वर दि.०५.०७.२०२२ रोजी दाखल केलेली आहे. त्या दुरुस्त दाव्याची प्रत प्रतिवादी क्र.१ ते ३, ७ व ८ यांनी दि.२५.०९.२०२३ रोजी घेतलेली आहे. परंतु त्यांनी दुरुस्त दाव्यास जादा कैफियत देण्यासंदर्भात अर्ज दाखल केलेला नाही अगर जादा कैफियत मुदतीत दाखल केलेली दिसुन येत नाही. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी दि.२१.११.२०२३ रोजी दाखल केलेला आहे. अर्जात नमुद कारणे पाहता दि.०५.०७.२०२२ नंतर दि.०४.१०.२०२२ पावेतो प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांची जादा कैफियत दाखल करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र.३ यांनी दावा दुरुस्त प्रत १ वर्ष, २ महिने व २० दिवसांनंतर घेतलेली आहे. तसेच दि.०४.१०.२०२२ नंतर दि.२१.११.२०२३ रोजीपर्यंत १ वर्ष, १ महिना व १७ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येतो.

६. अर्जात नमुद कारणे, तसेच दाव्याचे स्वरुप पाहता, प्रतिवादी क्र.३ विरुध्द वादींनी दाव्यात केलेली मागणी याचा विचार करता, दावा गुणदोषावर निकाली काढण्याकरिता प्रतिवादी क्र.३ यांना त्यांची जादा कैफियत देण्याची संधी दिल्यास न्यायोचित होईल. तसेच त्या कामी त्यांना झालेला विलंब माफ केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रस्तुत अर्ज मंजुर न केल्यास सदर प्रतिवादी क्र.३ यांचे अपरिमित असे नुकसान होईल. याउपरोक्त प्रस्तुत अर्जातील विनंती मंजुर केल्यास वादींच्या न्यायहक्कावर कोणतीही गदा येणार नाही आणि प्रतिवादी क्र.३ यांना त्यांचा बचाव मांडण्यांची संधी मिळेल. या सर्व कारणास्तव प्रतिवादी क्र.३ यांचा अर्ज मंजुर करण्यास

पात्र आहे. सबब मी खालील आदेश करीत आहेः–

## आदेश

**१.** अर्ज नि.क्र.८६ प्रतिवादी क्र.३ यांनी खर्च रक्कम रु.१०००/– (रुपये एक हजार फक्त) – प्रत्येकी रक्कम रु.५००/– वादी क्र.१ व २ यांना पुढील तारखेपर्यंत किंवा तारखेपुर्वी द्यावे या अटीवर मंजुर करण्यात येतो.

**२.** खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.३ यांना जादा कैफियत दाखल करण्यास झालेला १ वर्ष, १ महिना व १७ दिवसांचा विलंब माफ करण्यात येईल व त्यांना जादा कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येईल.

**३.** वर नमुद आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न झाल्यास प्रतिवादी क्र.३ यांचा अर्ज नि.८६ हा नामंजुर झाला असे समजण्यात येईल.

**४.** वर नमुद १ ते ३ बाबींची प्रतिवादी क्र.३ तसेच त्यांच्या विद्वान विधीज्ञांनी नोंद घ्यावी.

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2024.04.02 18:18:59 +0530

दौंड.
दि. ०२.०४.२०२४

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>Jt. C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Date | :- | 02.04.2024. |
| Order signed by the<br>Presiding Officer on | :- | 02.04.2024. |
| Order uploaded on | :- | 02.04.2024. |